क्र.उसं/औवशा/भूखंड हस्तांतरण/सुलभिकरण/२०१३/बी-१८४८१
उद्योग संचालनालय,नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३.१२.२०१३

# - शुध्दीपत्रक -

विषय : सहकारी औद्योगिक वसाहतींना शासनामार्फत दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टा कराराने दिलेल्या जमिनीमधील भूखंड हस्तांतरण प्रकरणी अधिमूल्य घेणेबाबत...

संदर्भ : क्र. उसं/औवशा/भूखंड हस्तांतरण/सुलभिकरण/२०१३/बी-१४७०८, दि. १७.९.२०१३

वरील विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय परिपत्रक निर्गमित करण्यात आले असून सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ४ मधील सूचना सुधारित करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे परिपत्रकात सुधारणा करण्यात येत आहे. उपरोक्त नमूद संदर्भिय कार्यालयीन परिपत्रकातील मुद्दा क्र. ४ हा अंशतः सुधारित करण्यात येत आहे. सुधारित मुद्दा क्र. ४ पुढील प्रमाणे वाचण्यात यावा.

**मुद्दा क्र. ४** वरील प्रमाणे पूर्तता झाल्यानंतर संबंधित सहकारी औद्योगिक वसाहतीचे संचालक मंडळाच्या सभेत भूखंड हस्तांतरणाबाबत ठराव संमत करावा. सदर सभेस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांचे अनुकूल अगर प्रतिकूल (वस्तुस्थितीवर आधारित) मत ठरावात नोंदविणे बंधनकारक राहील, असे मत नोंदविण्यात आले नंतरच संस्थेने हस्तांतरणाबाबतची आवश्यकता कार्यवाही करावी. शासकीय जमिनीवरील सहकारी औद्योगिक वसाहतींच्या दीर्घमुदती भाडेपट्टाकरारामध्ये नमुद केलेल्या अनु.क्र. एन (n) नुसार महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी नोंदविलेले अनुकूल मत हे ग्राह्य धरण्यात येऊन हस्तांतरणाची प्रक्रिया राबविण्यात यावी. याकरिता संस्थेने हस्तांतरणाबाबत आयोजित संचालक मंडळ सभेची नोटिस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना विषयसुचीसह संस्थेच्या

उपविधीतील तरतूदीनुसार द्यावी. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे मत प्रतिकूल असल्यासच असा प्रस्ताव उद्योग सह. संचालक, विभागीय कार्यालय/अधिक्षकीय उद्योग अधिकारी, विभागीय कार्यालयास मंजूरीस्तव पाठविण्यात यावा अन्यथा सहकारी औद्योगिक वसाहती यांनी त्यांचे स्तरावर कार्यवाही करावी.

सही/-

**सहनिबंधक सहकारी संस्था (सऔव)**

**मा.प्रधान सचिव (उद्योग)**
**यांच्या मान्यतेने**

**प्रति,**

१) मा. सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था,
३ रा मजला, सेंट्रल बिल्डिंग, महाराष्ट्र राज्य, पुणे

२) सर्व विभागीय सह. निबंधक सहकारी संस्था - मुंबई/पुणे/अमरावती/लातूर/कोंकण
विभाग/नागपूर/नाशिक/कोल्हापूर

यांना देऊन विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना उचित कार्यवाहीस्तव सुचित करण्यात यावे.

३) उद्योग सह संचालक,
विभागीय कार्यालय (सर्व)

४) महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र (सर्व)

यांना देऊन सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे अधिनस्त सर्व सहकारी औद्योगिक वसाहतींचे निदर्शनास आणून देऊन त्यानुसार अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

५) अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य सहकारी औद्योगिक वसाहत फेडरेशन लि.,
सांगली.
द्वारा वसंतदादा सहकारी औद्योगिक वसाहत, सांगली-४१६ ४१६.